The Poona Press
Owners Association Ltd.

Affiliated to AIFMP, New Delhi and
Maharashtra Mudran Parishad

दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशन लि.चे

# मुद्रण प्रकाश

84th Year
November 2022

मुद्रण, प्रकाशन व अनुषंगिक व्यवसायासंबंधी माहिती पुरविणारे
मुद्रकांनी मुद्रकांसाठी चालविलेले सर्वात जुने मासिक

## हार्दिक अभिनंदन!

प्रिंटविक २०२२ चे पारितोषिक विजेते
'अनबॉक्स' चे श्री. साहिल राव








एआयएफएमपीच्या
२०२२-२३ वर्षासाठी
श्री. रविंद्र जोशी
यांची अध्यक्षपदी
फेरनिवड





दि पूना प्रेस ओनर्स
असोसिएशन लि.चे
नवनिर्वाचित
संचालक मंडळ

NEXpress™

# Offset Packaging Solutions

your food stays protected, right from the farm to your plate



Product Basket for **100%** Protection!

Our Offset products have **IS 15495:2004** compliance

## Features:

- Cobalt Free and Non-VOC ink
- Excellent color intensity with best setting properties
- Best in-class Rub Resistance

**Regulatory compliance in case of Offset Packaging is as follows:**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Cobalt Free | Non-VOC | EN 71 | RoHS | SVHC | Packaging Waste Directive |

The Poona Press
Owners Association Ltd.

**कार्यकारी मंडळ**

| | | |
|---|---|---|
| श्री. रवींद्र दि. जोशी | अध्यक्ष | ९८२२०८२६४८ |
| श्री. तीर्थराज ज. जोशी | उपाध्यक्ष | ९८२२०२७३९४ |
| श्री. राहुल द. मारुलकर | चिटणीस | ९८२३०१५२०८ |

**मुद्रण साहित्य भांडार समिती**

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय आ. सावंत | चिटणीस | ९४२२८८१८८४ |
| श्री. कृष्णा रा. जागडे | सदस्य | ७७९८४६०२४० |
| श्री. विक्रम प्र. गोगावले | सदस्य | ९८२२५१५१५९ |
| श्री. राजेंद्र तु. सुपे | सदस्य | ९३७२८७२८८१ |

**वास्तू समिती**

| | | |
|---|---|---|
| श्री. दीपक म. ढोले-पाटील | चिटणीस | ९४२२०८५८९० |
| श्री. मोहन ह. फडतरे | सदस्य | ९८२२८२९३९३ |
| श्री. किशोर प्र. गोरे | सदस्य | ९९२२५५२२४४ |
| श्री. निलेश प्र. घोडके | सदस्य | ८८८८९१०१११ |

**शिक्षण व प्रकाशन समिती**

| | | |
|---|---|---|
| श्री. विनय र. कळसकर | चिटणीस | ९८२२०३६०३५ |
| डॉ. गणेश मा. दात्ये | सदस्य | ९८२३१२६१५० |
| श्री. गिरीश ना. राव | सदस्य | ९८२२०३२३३० |
| श्री. मंदार मु. उगार | सदस्य | ९८२२००१७९० |


## अं । त । रं । ग


दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशन लि. ७० वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न! ........ 5
दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशन लि. अध्यक्षपदी श्री. रवींद्र जोशी ........ 6
नवनिर्वाचित संचालक मंडळ ........ 7
दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनमध्ये गणेशोत्सव साजरा ........ 8
दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनचे खंडेनवमी पूजन ........ 9
दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनचे श्री लक्ष्मी-सरस्वती पूजन ........ 9
२५८ वी गव्हर्निंग कौन्सिल मिटिंग संपन्न ........ 10
Unbox Grabbed THE PRINTWEEK AWARD ........ 12
To Study Smart Packaging of Raw Food Using NFC Tags ........ 13
सचोटीला पर्याय नाही ........ 17
AIFMP Office Bearers 2022-23 ........ 19
माणसाने किती पासवर्ड लक्षात ठेवायचे? ........ 20
आपका साथ, साथ फूलों का... ........ 21
सुजित पटवर्धन सरांना भावपूर्ण श्रद्धांजली... ........ 22
समाजाभिमुख असलेला वेगळ्या शैलीतला मुद्रक ........ 23



**लेआऊट-डिझाईन :** अमोघ आर्टस्. फोन : ९३२६०८६२८५

**संपादक, मुद्रक आणि प्रकाशक :**
श्री. गिरीश राव यांनी आकृती, पुणे ४११०३७
येथे छापून दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशन लि., २०९/ब-४,
नवी पेठ, शरद पंडित पथ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
फोन : ०२०-२४४७१७७७, २४४३०४६०

Email : mudranprakash@gmail.com
**www.pressownerspune.org**



'मुद्रणप्रकाश'मधील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**केवळ संस्थेचे सभासद व अंतर्गत वितरणासाठी**


# संपादकीय



**सर्व सन्माननीय मुद्रक बंधू आणि भगिनींनो,**

सप्टेंबरच्या अखेरच्या आठवड्यात आपल्या संस्थेची निवडणूक झाली आणि नवीन नियमानुसार १५ संचालकांची नियुक्ती करण्यात आली.

आपल्या संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र जोशी यांची 'ऑल इंडिया फेडरेशन ऑफ मास्टर्स प्रिंटर्स'च्या अध्यक्षपदी २०२२-२३ या वर्षासाठी फेरनिवड झाल्याबद्दल त्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

आपल्या संस्थेच्या नवीन संचालक मंडळाच्या पहिल्या बैठकीमध्ये सर्व संचालकांनी निर्धार व्यक्त केला की, आपल्या संस्थेच्या सभासदांची संख्या वाढवून त्यांना मुद्रण व्यवसायात येणाऱ्या अडचणींना तोंड देण्यासाठी संस्थेतर्फे मदत करायची. यासाठी सर्व मुद्रकांनी सहकार्य करणे अपेक्षित आहे.

नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात संस्थेतर्फे मुद्रकांचा एक मेळावा आयोजित करायचा असे संस्थेने ठरविले आहे. या मेळाव्यामध्ये आपण जास्तीत जास्त संख्येने हजर राहावे व संस्थेच्या संचालकांबरोबर संवाद साधावा.

It is always said that your knowledge increases if you share it with other people या तत्त्वानुसार आपण एकमेकांमध्ये संवाद वाढवून आपल्या व्यवसायात येणारे अनुभव आपापसात शेअर केले तर आपण एकमेकांना नक्की मदत करू शकतो व नवीन संकल्पना आपल्या प्रेसमध्ये राबवू शकतो. यासाठी Knowledge to Share असा एक फोरम तयार करण्याचा संस्थेचा विचार चालू आहे, त्यासाठी आपण सहकार्य करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

येणारा काळ हा खूप स्पर्धात्मक असणार आहे. त्या स्पर्धेत उतरण्यासाठी आपल्याला नवीन कल्पना घेऊन उत्तम काम करावे लागेल.

आपल्या सर्वांना शुभेच्छा...!


आपला,
**गिरीश राव**
**संपादक**
मोबाइल : ९८२२०३२३३०




**Organised By:**
ALL INDIA FEDERATION OF
MASTER PRINTERS

**In Association With:**
PRINT-PACKAGING.COM
(P) LTD.

**Print-Packaging.com (P) Ltd.**
**Mumbai :** F 101, Tower No. 7, First Floor, International Infotech Park,
Vashi Railway Station, Vashi, Navi Mumbai 400 705.
Tel : 91-22-27812093, 27812619, 27812657
Fax : 91-22-27812578
Email : info@print-packaging.com

www.Pamex.in

# अध्यक्षीय मनोगत



**सन्माननीय मुद्रक बंधू/भगिनींनो,**
**सप्रेम नमस्कार !**

गेल्या काही महिन्यांपासून आपल्या सदस्य मुद्रक बांधवांचा संस्थेच्या/संघटनेच्या कार्यातील सक्रिय सहभाग कमी झाल्याचे प्रकर्षाने जाणवते आहे. आपली ही संस्था / संघटना बळकट करणे व त्यामध्ये नवचैतन्य भरणे, हे तुमच्या प्रत्येकाच्या सहभागाशिवाय शक्य नाही. आपल्या ह्या संस्थेला १०३ वर्षांचा इतिहास आहे, आणि मी आणि सर्व संचालक मंडळ, हा देदीप्यमान इतिहास जपण्यासाठी आणि संस्थेच्या प्रगतीसाठी बांधील आहोत आणि त्यासाठी आम्ही सर्व संचालक अत्यंत प्रामाणिक प्रयत्न करत असतो आणि करत राहू, परंतु ह्या प्रयत्नांमध्ये तुम्हा सर्वांचा सहभाग मिळणे हेदेखील अत्यंत आवश्यक व महत्त्वाचे आहे. आपला सहभाग कमी असण्याची अथवा सहभाग नसण्याची नक्कीच काही कारणे असतील, आणि ती कारणे जाणून घेण्यासाठी, संस्थेच्या संचालकांशी तुमचा प्रत्यक्ष संपर्क असणे हेही तितकेच अत्यंत महत्त्वाचे आहे आणि ह्याच कारणाने प्रत्येक सभासदाचा संस्थेच्या उपक्रमात व कार्यक्रमात सहभाग असणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात, काही वर्षांत आपल्या समस्या जटिल होण्याची शक्यता आहे. आणि ह्या समस्यांना एकत्रितपणे तोंड देण्यासाठी अथवा सर्व समस्यांशी दोन हात करण्यासाठी आपण सर्वजण एकत्रितपणे एक संघटना म्हणून उभे राहणे गरजेचे आहे आणि म्हणूनच मला असे वाटते की, प्रत्येक सभासदाचा संस्थेच्या कार्यात सक्रिय सहभाग खूप गरजेचा व महत्त्वाचा वाटतो... आणि आता हीच वेळ आहे, एकत्र येण्याची व एकत्र राहण्याची!

मुंबई येथे नुकताच प्रिंटविक पारितोषिक वितरण सोहोळा (Print Week Awards - 2022) पार पडला. आपले विद्यमान संचालक श्री. गिरीश राव, ह्यांचे चिरंजीव व अनबॉक्स (UNBOX) ह्या कंपनीचे सर्वेसर्वा, श्री. साहिल गिरीश राव ह्यांनी यंदाचा प्रिंटविक २०२२ चा उत्कृष्ट प्रिंटिंग-पॅकेजिंग हा बहुमान पटकावला, ह्याबद्दल त्यांचे कौतुक!

नविन पिढीतील, श्री. साहिल राव ह्यांनी अत्यंत कमी व्यवसाय कालावधीत ही देदीप्यमान कामगिरी केली. त्यांची ही कामगिरी आपल्या संस्थेसाठी व पुण्यातील मुद्रक बांधव व मुद्रण व्यवसायासाठी अभिमानास्पद बाब आहे.

प्रिंटविकचा उत्कृष्ट प्रिंटिंग-पॅकेजिंग श्रेणीतील हा बहुमान पुण्याला प्रथमच प्राप्त झाला आहे आणि ह्या यशाबद्दल साहिल राव ह्याचे विशेष अभिनंदन..!

**रवींद्र दि. जोशी**
**अध्यक्ष**

The Poona Press Owners Association Ltd.

## सर्व मुद्रक बंधूंनी भांडारातून जास्तीत जास्त साहित्य खरेदी करावे ही विनंती.

HURRY UP! SPECIAL DISCOUNT SUPER OFFER

FOR IMMEDIATE PAYMENT

* BUY NOW

# TOYO JPN

**4 Colour Process Ink for Offset Printing**

Any purchase between 1 to 99 kg. ₹ **1520/-** for 1 set of 1 Kg. CMYK

Any purchase above 100 kgs.

₹ **1492/-** For 1 Set of 1 Kg. CMYK

Mudran Black Ink available in 5 kgs & 20 kgs.



## BINDING MATERIAL

**Binding Cloth [Blue / Red]** (42" x 28 mtr.) Rs. 28/- per mtr.

| | | |
|---|---|---|
| **Binding Paste :** | Blue | Rs. 20/- per kg. |
| | White | Rs. 25/- per kg. |

**Stitching Wire**

| Only Coil (Without Spool) | | Coil with Spool | |
|---|---|---|---|
| Gauge / No. 20, 22, 24 | Rs. 230/- per coil | Gauge / No. 20, 22, 24 | Rs. 265/- per coil |
| Gauge / No. 26 | Rs. 235/- per coil | Gauge / No. 26 | Rs. 270/- per coil |

## ADHESIVES

**Perfect Binding Gum**

| | | | |
|---|---|---|---|
| Main / Spine : | Pigmented | SM 409 | Rs. 240/- per Kg. |
| | | SM 410 | Rs. 265/- per Kg. |
| Main / Spine : | Pigmented | SM 426 | Rs. 310/- per Kg. |
| | (White) | SM 444 | Rs. 355/- per Kg. |
| Side | Non Pigmented | SM 401 | Rs. 285/- per kg. |
| Spine / Side | Non Pigmented | SM 401 | Rs. 285/- per kg. |

***(Packing : 30 kg. Bag)***

**RoyalCol** Rs. 80/- per kg.
Waterbase Adhesive

**KWALITY INKS**

**SPARK - Rs. 1,120/- per set of CMYK 1 kg each.**
*(available in 2kg packing)*
*[for Maplitho / Calender]*

**DIC - Pustak Black Ink,**
*[available only in 20 kg bucket ]*



## STRAPPING (PACKING) PATTI

| | **9 mm & 12 mm** |
|---|---|
| 1 Roll to 19 Rolls | Rs. 450/- per Roll |
| 20 Rolls & above | Rs. 400/- per Roll |

***(Packing : 1 Bundle of 2 Rolls)***

## CRAFT PAPER

**36" x 43"**
65 GSM - Rs. 125/- per Dasta
90 GSM - Rs. 170/- per Dasta
***(1 Dasta : 24 sheets)***

*GST will be extra as applicable. • Special Rates are subject to payment against delivery.*

The prices mentioned are subject to change without prior notice and till stock lasts.

| श्री. संजय आ. सावंत | श्री. कृष्णा रा. जागडे | श्री. राजेंद्र तु. सुपे | श्री. विक्रम प्र. गोगावले |
|---|---|---|---|
| चिटणीस | सदस्य | सदस्य | सदस्य |

# मुद्रण साहित्य भांडार

'मुद्रक भवन', १०७८, सदाशिव पेठ, शनिपाराजवळ, पुणे - ४११०३०
फोन : ०२० - २४४७१७७७ / २९९८०२८१ • मोबाइल : ९९२३००१५५८ • Email : ppoamsb@gmail.com

# दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशन लि.

# ७० वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न!

'दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशन लि.'ची ७० वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि. २१/०९/२२ रोजी दुपारी ठीक ४ वाजता संस्थेच्या, 'पुणे मुद्रण विद्यालय भवन, २०९/ ब-४ नवी पेठ, पुणे - ४११ ०३० येथील सभागृहात पार पडली.

सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ सदस्य व माजी संचालक श्री. सुरेंद्र सावळे हे होते. ह्या संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य, ज्येष्ठ सभासद, माजी संचालक, निवडणूक अधिकारी, संस्थेचे चार्टर्ड अकाउंटंट, कंपनी सेक्रेटरी, अंतर्गत लेखा परीक्षक व संस्थेचा कर्मचारीवर्ग असे सगळे उपस्थित होते. ह्या सर्वसाधारण सभेपूर्वी संस्थेची निवडणूक प्रक्रिया पार पडली. उपलब्ध जागांपेक्षा कमी उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक बिनविरोध झाली. नवनिर्वाचित संचालक सदस्य, सर्व निवडणूक अधिकारी श्री. शिरीष घाटपांडे, श्री. गोपाळ घोडके, श्री. समीर मकाशीर, श्री. श्रीनिवास कातरकी व श्री. अनंत जोशी. संस्थेचे चार्टर्ड अकाउंटंट, कंपनी सेक्रेटरी, अंतर्गत लेखा परीक्षक व संस्थेचा कर्मचारीवर्ग सर्वांचा सत्कार करण्यात आला. ह्यानंतर उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला. ह्यानंतर संस्थेचे चिटणीस श्री. तीर्थराज जोशी ह्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्याचे जाहीर केले. ■



# दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशन लि. च्या अध्यक्षपदी श्री. रवींद्र जोशी

## उपाध्यक्षपदी श्री. तीर्थराज जोशी तर सचिवपदी श्री. राहूल मारुलकर

सोमवार दि. ३ ऑक्टोबर २०२२ रोजी नवनिर्वाचित कार्यकारी संचालक मंडळाची बैठक पार पडली. नविन घटनेनुसार नविन संचालक मंडळाचा कार्यकाळ ३ वर्षाचा करण्यात आला आहे.

संचालक मंडळाच्या ह्या बैठकीत श्री. रवींद्र जोशी ह्यांची संस्थेच्या अध्यक्षपदी एकमताने पुनर्निवड करण्यात आली. श्री. तीर्थराज जोशी ह्यांची उपाध्यक्षपदी व श्री. राहूल मारुलकर ह्यांची चिटणीस पदावर निवड करण्यात आली.



# दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशन लि.चे

# नवनिर्वाचित संचालक मंडळ



श्री. रवींद्र दि. जोशी
अध्यक्ष



श्री. तीर्थराज ज. जोशी
उपाध्यक्ष



श्री. राहुल द. मारुलकर
चिटणीस

## मुद्रण साहित्य भांडार समिती



श्री. संजय आ. सावंत
चिटणीस



श्री. कृष्णा रा. जागडे
सदस्य



श्री. विक्रम प्र. गोगावले
सदस्य



श्री. राजेंद्र तु. सुपे
सदस्य

## वास्तू समिती



श्री. दीपक म. ढोले-पाटील
चिटणीस



श्री. मोहन ह. फडतरे
सदस्य



श्री. किशोर प्र. गोरे
सदस्य



श्री. निलेश प्र. घोडके
सदस्य

## शिक्षण व प्रकाशन समिती



श्री. विनय र. कळसकर
चिटणीस



डॉ. गणेश मा. दात्ये
सदस्य



श्री. गिरीश ना. राव
सदस्य



श्री. मंदार मु. उगार
सदस्य

# दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनमध्ये गणेशोत्सव साजरा

सालाबादप्रमाणे संस्थेत दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनचा 'गणेशोत्सव-२०२२' साजरा करण्यात आला. भाद्रपद शुद्ध चतुर्थी, म्हणजेच 'गणेश चतुर्थी,' बुधवार, दि. ३१ ऑगस्ट २०२२ रोजी 'श्रीगणेशाची' प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. संस्थेचे विद्यमान संचालक व भांडार समितीचे चिटणीस श्री. संजय सावंत व त्यांच्या पत्नी सौ. संजीवनी संजय सावंत ह्या जोडप्याच्या शुभहस्ते श्रीगणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. याप्रसंगी संस्था संचालक, ज्येष्ठ सभासद व संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

हा दिवस म्हणजे 'मुद्रण साहित्य भांडारा'चा वर्धापनदिन! ह्या वर्षी, म्हणजे २०२२ साली, मुद्रण साहित्य भांडाराला ७७ वर्षे पूर्ण झाली. अतिशय शुचिर्भूत व मंगलमय वातावरणात 'श्रीगणेशाची' स्थापना केली गेली. ह्या उत्सवाच्या निमित्ताने संस्थेच्या कार्यालयात आकर्षक सजावट व रांगोळी रेखाटन करण्यात आले होते.

प्रथेप्रमाणे दीड दिवसाचा हा उत्सव आनंदात व भक्तिमय वातावरणात पार पडला. दुसऱ्या दिवशी सायंकाळी गणेश प्रतिमेचे विसर्जन करण्यात आले. ह्या प्रसंगी संचालक मंडळ सदस्य व कर्मचारी उपस्थित होते. भावपूर्ण वातावरणात 'श्रीगणेशाला' निरोप देण्यात आला. ■



# दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनचे खंडेनवमी पूजन

मंगळवार दि. ४ ऑक्टोबर, दरवर्षीप्रमाणे संस्थेच्या सदाशिव पेठ येथील वास्तूमध्ये खंडेनवमी पूजनाचा कार्यक्रम पार पडला. भांडार शाखेतील वजन काटा, संगणक व इतर विक्री योग्य साहित्याचा प्रत्येकी एक एक नग ह्या सगळ्याचे पूजन करण्यात आले. संस्थेचे संचालक आणि भांडार समितीचे चिटणीस श्री. संजय सावंत ह्यांच्या शुभहस्ते खंडेनवमी पूजन करण्यात आले.

ह्या प्रसंगी संस्था संचालक, सदस्य व संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते. ■



# दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनचे श्री लक्ष्मी-सरस्वती पूजन



सोमवार दि. २४ ऑक्टोबर रोजी संस्थेच्या सदाशिव पेठ येथील कार्यालयात श्री लक्ष्मी-सरस्वती पूजन समारंभ पार पडला. संस्थेच्या वास्तूसमितीचे सदस्य संचालक श्री. मोहन फडतरे व त्यांच्या पत्नी सौ. स्मिता फडतरे ह्यांच्या शुभहस्ते श्री लक्ष्मी-सरस्वती पूजनाचा कार्यक्रम पार पडला. ह्यानिमित्ताने संपूर्ण कार्यालयामध्ये सर्वत्र सजावट करण्यात आली होती. विद्युत रोषणाई, रांगोळी व फुलांची सजावट करण्यात आली होती. ह्या समारंभास संस्थेचे सदस्य संचालक व संस्थेतील कर्मचारी उपस्थित होते. ■




# ऑल इंडिया फेडरेशन ऑफ मास्टर प्रिंटर्स
# २५८ वी गव्हर्निंग कौन्सिल मीटिंग संपन्न
## दि. २३ ते २५ सप्टेंबर २०२२, हॉटेल मॅरिएट, कोचि, केरळ

**तीर्थराज जोशी, उपाध्यक्ष**

या वर्षीच्या GC Meeting चे खास आकर्षण होते अर्थातच आपल्या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री. रवींद्र जोशी, आपल्या संस्थेचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर लगेचच AIFMP GC Meeting होती. यावर्षी West Zone कडून President AIFMP चा मान होता. West Zone मधून कोणीच अर्ज न भरल्यामुळे आपले लाडके अध्यक्ष AIFMP चे पुन्हा एकदा विद्यमान अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले. गेल्या निवडणुकीमध्ये आपल्या संस्थेचे १००वे वर्ष होते तेव्हा बहुमताने निवडून आलेले आपले अध्यक्ष श्री. रवींद्र जोशी यांनी मागे वळून पाहिलेच नाही. अध्यक्षपद मिळवण्यापूर्वीसुद्धा त्यांनी अनेक पदांवर जबाबदारी स्वीकारून AIFMP करता भरीव कामगिरी केली होती. तसेच सतत कित्येक वर्षे AIFMP करता प्रचंड काम केले असल्याने यावर्षीची निवडणूक बिनविरोध झाली. भारतात सर्व असोसिएशनबरोबर चांगले संबंध प्रस्थापित केल्याने यावर्षी PPOA च्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला गेला. AIFMP ने स्वत:ची जागा विकत घेतली असून त्यावर AIFMP Bhavan बांधण्याचा मानस आहे. त्यासाठी अध्यक्ष विशेष प्रयत्न करत असून त्या भवनामध्ये Quality Control Lab / Printing Library / Printing Education / New Technology याबद्दलचे विविध उपक्रम केले जातील असे अध्यक्षांच्या मनात आहे. तसेच यावर्षीच्या PAMEX Exhibition चे सुद्धा Chairperson श्री. रवींद्र जोशी असून त्यांच्यावर खूप मोठी जबाबदारी आहे ती ते लीलया पार पाडतील याचा विश्वास आहे. संस्थेच्या इतर संचालकांनी त्यांना मदतीचा भक्कम हात द्यावा ही नम्र विनंती. यावर्षीची AGM & GC Meeting Kochi येथे KPA यांनी आयोजित केली होती. खूप चांगल्या Location वर चांगल्या हॉटेलमध्ये ही GC Meeting आयोजित केली होती. KPA ने अत्यंत सुंदर प्रकारे GC Meeting ची व्यवस्था केली होती. सर्व AIFMP च्या मेंबर्सचीही ते विचारपूस करत होते. हॉटेल, रुम्स व जेवणाची व्यवस्थासुद्धा चोख होती.

कोरोनानंतरच्या काळात खर्चाचा ताळमेळ बसत नसूनसुद्धा KPA च्या सर्व मेंबर्सनी जबाबदारी चांगली पार पाडली. GC Meeting चे सर्व विषय व्यवस्थितरीत्या संपन्न झाले व AGM ला सुरुवात झाली. निवडणूक प्रक्रिया सुरू झाली व संस्थेचे पदाधिकारी घोषित करण्यात आले. ऐनवेळी माघार घेतल्याने सर्व जागा बिनविरोध निवडून आल्या. यावर्षी West-Vice President म्हणून आपले सभासद श्री. अनंत विश्वनाथ जोशी VP (West) म्हणून निवड करण्यात आली. सर्वांनी त्यांना अनुमोदन दिले व PPOA च्या GC / GB Members ने एकच जल्लोष केला. व्यासपीठावर यावर्षी President रवींद्र जोशी व West VP म्हणून अ.वि. जोशी बसणार याचा विशेष आनंद सर्वांना झाला. अध्यक्षीय भाषणात रवींद्र जोशी यांनी मुद्रकांसाठी अनेक उपक्रम करण्याचा मानस व्यक्त केला, तसेच मुद्रकांचे गेलेले वैभव परत मिळवण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावे असे सांगितले - ***Proud to be a Printer, Print is alive.***

दुसऱ्या दिवशी KMPA तर्फे PPOA च्या मेंबर्ससाठी ओनमचा कार्यक्रम आयोजित केला होता AIFMP चे नवनिर्वाचित President यांचे पहिलेवहिले स्वागत, भाषण व सन्मान करण्याचा मान KMPA ने पटकवला. त्यांनी आमच्या सर्वांचे जोरदार स्वागत केले. ओनमसाठी त्यांच्या असोसिएशनचे सर्व मेंबर कुटुंबासहित जमले होते. विविध कार्यक्रम त्यांनी आयोजित केले होते. रवींद्र जोशी यांचा सत्कार करण्यात आला, तसेच संगीत, नृत्य, गाणे, नाटक असे कार्यक्रम झाल्यावर भोजनाचा आस्वाद घेऊन आम्ही परतलो. त्या हॉलमधील डेकोरेशन, फुलांची सजावट व मांडणी, नियोजन अत्यंत उत्कृष्ट होते. ओनम म्हणजे नक्की काय असते याचा प्रत्यक्ष अनुभव सर्वांनी घेतला.





TechNova
SUBA
bindwel > welbound
TOYOINK
ALL INDIA FEDERATION OF MASTER PRINTERS
258th GOVERNING COUNCIL MEETING
&
69th ANNUAL GENERAL BODY MEETING
2022 September 23-25
at Kochi Marriott Hotel
Hosted by
KERALA PRINTERS ASSOCIATION
TechNova
SUBA
bindwel > welbound
TOYOINK












Onam 2022










# UNBOX GRABBED THE PRINTWEEK AWARD



Unbox is a Luxury Packaging Company specialised into rigid boxes.

Few months back, we had applied for the PrintWeek Awards.

Printweek awards takes place in Mumbai and have been recognised throughout India. All the print & packaging giants participate for these awards to make their brand stand out.

We need to send 5 of our best samples through which the judges will nominate you. Around 30-40 firms apply for every category from which 5-6 firms get nominated.

From this nomination, generally only one company gets the awards for the best company in india for that specific category.

This year Unbox had applied for the Packaging Converter of The Year (Rigid Boxes) category.

Few months back, we got to know that we were nominated for this category and on 2nd November 2022 we won the award for the Best Packaging Company in India producing Rigid Boxes.

These awards were held at the Grand Hyaat Mumbai.

## श्रीमती वृंदाताई अरविंद खुर्जेकर यांची सभागृह बांधकामास रुपये ५० लाखाची मदत

पीसीएमसी, निगडी प्राधिकरण येथे श्री. दत्तोपंत म्हसकर न्यास या आरएसएसतर्फे चालविल्या जाणाऱ्या संस्थेस श्रीमती वृंदाताई अरविंद खुर्जेकर यांनी रुपये ५० लाख निधी देऊन भव्य सभागृहाचे बांधकाम केले, त्यांच्या हस्ते विजयादशमीला याचे उद्घाटन करण्यात आले. या सेवा कार्यास आपले सभासद संजय कुलकर्णी, केदार मुद्रणालय (चिंचवड) यांनी मदत केली.

कै. अरविंद नरहर खुर्जेकर यांनी १९६० रोजी श्री त्रिमूर्ती मुद्रिका या नावे चिंचवड येथे बाईंडिंग व्यवसाय सुरू केला. त्यांची अर्धांगिनी वृंदाताई यांनी बरोबरीने व्यवसाय करताना नामवंत प्रिंटर म्हणून नावलौकिक मिळविला.

अतिशय कष्टातून वक्तशीरपणा, व्यवहारी दृष्टिकोन, मृदु स्वभाव या गुणांनी व्यवसायाची भरभराट केली. प्रेसमधील कामगारांना घर घेण्यास मदत केली, शिवाय धार्मिक व विविध शैक्षणिक संस्थांना अनेक



प्रकारे मदत करताना दानशूरपणा दाखविला. २०१८ साली मोरया हॉस्पिटल चिंचवड येथे, कै. अरविंद नरहर खुर्जेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ बाह्यरुग्ण विभाग कोटी रुपयांमध्ये मदत करत उभा केला.

अशा या दानशूर मुद्रक भगिनी श्रीमती वृंदाताई यांचा आपल्या संस्थेस अभिमान वाटतो.



# To Study Smart Packaging of Raw Food Using NFC Tags



**Mr. Dwayne J. Mandy**
Student - PVG COET

**Guide: Prof. Shrikala Kanade**
*Assistant Professor, PVG'S COET*

Technological advances in smart sensors and wireless interfaces are bringing the digital and physical worlds closer together through remote monitoring of a wide variety of parameters, finding application in the fields of agriculture, healthcare, etc. These technologies are also much needed to address hunger related global challenges. For example, the United Nations Food and Agriculture Organization (UNFAO) estimates that roughly one-third of all food produced for human consumption is lost or wasted worldwide. Packaging is of utmost importance in today's commercial world, leading manufacturers to find the best solutions to respond to customer's needs. The latest Industry 4.0 technologies allow producers to move a step further in digitizing their production and making customers feel more connected. This corresponds to 1.3 billion tons of food per year. Much of this wasted food is still safe to eat, but consumers throw it away because it is close to or beyond its printed expiration date. In some cases, smart labels could be useful to provide better estimates of the packaged food quality.


The application of Near Field Communication (NFC) technology in wireless intelligent devices was reported due to their portable, low-cost, battery-free and smartphone communicable features. An NFC tag is an inexpensive and convenient paper-like resonant circuit that can be easily placed anywhere, allowing contactless communication with a smartphone to transfer stored information once the tag is detected to be readable. On the basis of these advantages, the NFC tag can be equipped with additional sensing abilities by modification with a sensor to switch the smartphone readout upon contacting a certain amount of a chemical.

For Raw food packaging in most food packages, the presence of undesired gases could indicate the loss of quality and shelf-life of the food, as they originate from the oxidation of the content or the microbial growth. While spoilage can take many forms, inflated or swollen food packages serve as the beacon of microbial contamination. This is known as Blown Pack Spoilage (BPS). A precise, convenient, and low-cost method to assess the status of food is highly desired to help avoid spoilage for consumers, storage, and supply chains. Analytical methods for monitoring meat spoilage rely on the detection of the Total Volatile Basic Nitrogen (TVBN), including biogenic amines (BAs) and ammonia (NH3). Among them, BAs, such as putrescine and cadaverine, are the most significant markers and the origin of the bad odour from meat decomposition. These gases released can be detected by NFC tags embedded with the packaged food. There are many types of NFC tags used for detecting food spoilage having different functions but same result. One of the types of NFC tags are a flexible strain sensor and a printed temperature sensor integrated with an NFC tag to detect the temperature and strain in a semi-quantitative and visual way. The resistive strain sensor was fabricated with a flexible polymer Polydimethylsiloxane (PDMS) microchannel filled with conductive polymer polystyrene sulfonate (PEDOT: PSS). Other type of NFC tags used in detecting food spoilage is the use of p-toluenesulfonate hexahydrate (PTS) doped with polyaniline (PAni). PTS-doped and cross-linked PAni exhibits high sensitivity toward amines, for example, 46% and 17% sensitivity toward 5 ppm putrescine and cadaverine.

The use of NFC is much more immediate than QRcode: in the case of a QRcode, it is necessary to launch the application that performs the function of the scanner, to frame the QRcode in favorable light conditions, to read the QRcode and to acknowledge the contents of the URL from the browser. In the case of NFC, simply the approach of the smartphone to the object automatically launches the application that reads all the data from the tag. NFC requires no special lighting conditions and pointing to a figure.




PEDOT: PSS NFC is used for strain sensing and temperature sensing of raw food that is meat. PEDOT: PSS is attractive as it is one of the most stable organic conductive polymers and it exhibits electrical properties similar to a metal or semiconductor. Therefore, this material is suitable for the fabrication of temperature sensors on flexible substrates and can operate over high-temperature ranges. For this reason, PEDOT: PSS is used in this work as the active sensing material for both temperature and strain sensors. The strain sensor uses conductive polymer poly (3,4-ethylenedioxythiophene) polystyrene sulfonate (PEDOT: PSS) as the active material in a microchannel made from flexible and transparent Polydimethylsiloxane (PDMS) polymer. The temperature sensor consists of silver electrodes and PEDOT: PSS printed on a flexible polyvinyl chloride (PVC) substrate. A custom planar coil antenna was designed and fabricated to achieve battery-less operation by powering the tag using an NFC reader. The bulge in a food package can be detected using an appropriate strain sensor integrated with it. Temperature is another crucial factor in determining the shelf-life of food products. Temperature alterations can provoke the growth or survival of food-spoilage microorganisms and bacteria.







PTS-PAni is a nanostructured conductive polymer-based gas sensor that can detect various TVBN concentrations with very high sensitivities of NH3, putrescine, and cadaverine. The gas sensor with a high On"Off ratio plays the role as a sensitive switch in the circuit of the NFC tag, enabling the smartphone to readout meat spoilage when the concentration of biogenic amines is over a pre-set threshold. This intelligent sensing device realizes an effective wireless sensing assisted by mobile phones without requiring professional equipment and shows tremendous promise in applications for food status monitoring in daily life. Nanostructured polyaniline (PAni) is easy to be micropatterned on an NFC tag by inkjet printing technology, p-toluenesulfonate hexahydrate (PTS) is used because its sulfonate functional group can dope PAni efficiently.

NFC Tamper Proof anti-counterfeiting tag is used in Food package for protection of food. Food Label Package Seal Tag Quality Certify the food package the guarantee of food quality and expired time online control. This helps in Food supply source traceability of the package. This NFC tags have Food seal identification and online quality tracking.

NFC could also play a role in the war on waste. The World Bank estimates that, on average globally, each person generates 1.2kg of waste per day. As the population grows, so does the seriousness of this problem.




Consider the one billion plastic bottles purchased around the world every minute, of which less than 50% are collected for recycling and only 7% are turned into new bottles. If we could increase recycling to 97%, there is the potential to save around 18 million tonnes of $CO_2$.This is an issue that Gen Z is especially concerned about. NFC could be used to deliver access to clear and localised information, making it much easier to understand how and where to recycle the product and its packaging. NFC could also be used to incentivise consumers. For example, a smart recycling bin could count the number of items that are placed into it and give credits for how much is collected. Gen Z consumers are likely to be the driving force pushing for these environmental initiatives to be widely adopted. There have been many examples of NFC smart packaging in the retail sector: Johnnie Walker, Rémy Martin, Malibu and Ferngrove Wine Group have all implemented trials. These NFC-based campaigns have mostly been restricted to high-value goods with high profit margins, in low-volume product trials and marketing promotions. The reason is mostly two-fold: firstly, the cost of the NFC/RFID tags has been high and secondly, the software to handle the data has been immature. Fortunately, more companies are now offering great complete turnkey platform solutions and software packages. Plus, new technologies and production processes are emerging that significantly reduce the cost of the key tag components, such as the integrated circuit which is the brain in the NFC tag. These developments will power the mass-market adoption of NFC smart packaging in the near future and deliver the brand engagement that the Gen Ze's are demanding.

## मुद्रण साहित्य भांडारातर्फे मुद्रकांना सेवा पुरविण्यासाठी दुचाकी खरेदी






गुरुवार दि. १३ ऑक्टोबर २०२२ रोजी संस्थेच्या मुद्रण साहित्य भांडार शाखेने उत्पादने विक्री पश्चात माल पोहोच करण्याच्या उद्देशाने विजेवर चालणारी दुचाकी खरेदी केली. मुद्रण साहित्य भांडार अल्प नफा ह्या तत्त्वावर मुद्रण साहित्याची विक्री करत असल्याने, सदर साहित्याचे / मालाचे वितरण (डिलीव्हरी) खरेदी करणाऱ्यापर्यंत अत्यंत कमी खर्चात करण्याच्या हेतूने ही दुचाकी खरेदी करण्यात आली आहे. जास्तीत जास्त मुद्रकांनी मुद्रण साहित्य भांडारातून माल खरेदी करून आपला फायदा व संस्थेच्या उभारणीमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, हीच अपेक्षा.

HAPPY BIRTHDAY

# नोव्हेंबर महिन्यातील वाढदिवस

| क्र. | सभासदांचे नाव | मुद्रणालयाचे नाव | जन्मदिनांक | दूरध्वनी | मोबाईल |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. भागवत विशाल हरिभाऊ | व्हीजन प्रिंटर्स | ०२/११/१९८२ | ९९२२९६९०३१ | - |
| २) | श्री. पाटकर अमित उल्हास | आशू प्रिंटर्स | ०५/११/१९९० | ९६२३८३०४०६ | - |
| ३) | कु. राधा रवींद्र जोशी | युनायटेड मल्टिकलर प्रिंटर्स प्रा. लि. | ०५/११/१९९७ | - | २४४५३०४३ |
| ४) | श्री. मालू शैलेश जुगलकिशोर | निहार लॅमिनेशन | ०७/११/१९७६ | - | २४२२४१२३ |
| ५) | श्री. ठोंबरे अजित सदानंद | प्रतिमा ऑफसेट | ०८/११/१९६८ | - | २५४६०२१६ |
| ६) | श्री. भोईर विनय जंगलराव | आनंद एंटरप्रायजेस | ०८/११/१९७५ | ९८२२८२३३३३ | - |
| ७) | श्री. नाईक राजन मधुकर | लताली प्रिंटर्स | ०९/११/१९६३ | - | २४४५५०९६ |
| ८) | श्री. बिर्जे दीपक चंद्रकांत | दि मॉडर्न आर्ट | ०९/११/१९६९ | ९४२२५१५९२० | |
| ९) | श्री. देशपांडे शाम रंगनाथ | पॅकार्ट्स | ११/११/१९४६ | ९२२५५७१३८५ | |
| १०) | श्री. कुलकर्णी राजेश विनायक | कीट्रॉनिक्स (इं.) प्रा. लि. | ११/११/१९७० | ९८२२०३९८१३ | |
| ११) | श्री. पाटणकर दिनकर दत्तात्रय | पाटणकर प्रिंटर्स | १२/११/१९५८ | - | २४४५५९०१ |
| १२) | श्री. दीक्षित शशिकांत मोरेश्वर | नुपूर ग्राफिक्स | १२/११/१९७८ | ९४२२५०८९८४ | |
| १३) | श्री. वीरकर मंगेश मोहन | वैभव प्रिंटर्स | १२/११/१९९० | - | २४३७०७६० |
| १४) | श्री. शिंदे अर्जुन मारुती | साक्षी प्रिंटर्स | १४/११/१९७२ | ७७९८५३१३१३ | |
| १५) | श्री. नागपूरकर माधव जयराम | श्री मुद्रण मंदिर | १८/११/१९५४ | - | २४४७३३६० |
| १६) | श्री. टकले जितेंद्र सुधाकर | सन ग्राफिक्स | १९/११/१९६६ | ९६८६९४००९८ | २४३३८२०० |
| १७) | श्री. गाडेकर योगेश तुकाराम | डी.एन.एम.प्रिंटिंग हाऊस | २३/११/१९८५ | ९८२३७३०५५३ | |
| १८) | श्री. सोहोनी सतीश मोरेश्वर | शुभदा प्रिंटर्स | २३/११/१९५७ | ९४२२५०३९२९ | |
| १९) | श्रीमती हेमलता शिरीष बोरगे | शिशिर प्रिंटर्स | २३/११/१९६७ | ९८९०६४५५६१ | |
| २०) | श्री. हजारे अनिल दत्तू | साक्षी एंटरप्राईजेस | २४/११/१९८२ | ९८५०३००४३० | |
| २१) | श्री. पटवर्धन विद्याधर निळकंठ | मुद्रिका कमर्शिअल प्रिंटर्स | २७/११/१९३५ | २४४७६८१३ | |
| २२) | सौ. कळसकर असिलता विनय | बीट-बाईट्स | २७/११/१९६८ | ९८२२२३७०३५ | |
| २३) | श्री. चारूलकर व्ही. व्ही. | मोनिका आर्ट्स | २८/११/१९६१ | ९८२२८८०२०० | |
| २४) | श्री. सुराणा राजकुमार | जयपाल प्रिंटिंग प्रेस | २९/११/१९६६ | - | २६३८८०३४ |
| २५) | श्री. जाजू गोपाळ रामकिसन | इमेज प्रोसेस | २९/११/१९६८ | ९४२२०८४६७८ | - |
| २६) | श्री. लडकत आनंद मुरलीधर | विनायका एंटरप्रायजेस | २९/११/१९७१ | ९३७१०१६७९४ | |

The Poona Press
Owners Association Ltd.

मुद्रक मेळावा

**सर्व मुद्रक बंधू-भगिनी सप्रेम नमस्कार...**

मुद्रण व्यवसायातील आपले अनुभव, विचार आपल्या कल्पना मुद्रक मित्रांबरोबर शेअर करण्यासाठी व मुद्रण व्यवसायातील मुद्रकांचा एकमेकांशी परिचय होण्यासाठी व वाढवण्यासाठी **दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनतर्फे**

**मंगळवार, दि. ६ डिसेंबर २०२२ रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत**

**स्थळ : लोकमान्य सभागृह, केसरीवाडा, नारायण पेठ, पुणे ४११ ०३० येथे**

## मुद्रक मेळावा

आयोजित करण्यात आला आहे.

आपण सर्वांनी या मेळाव्याला जास्तीत जास्त संख्येने हजर राहून आपल्या मुद्रक मित्रांबरोबर व दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशनच्या संचालकांबरोबर संवाद साधावा ही विनंती. मेळाव्यानंतर भोजनाची सोय केली आहे.

आपले नम्र,

| रवींद्र जोशी | तीर्थराज जोशी | राहूल मारूलकर |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | **उपाध्यक्ष** | **सचिव** |

**आणि सर्व संचालक**

कृपया आपली उपस्थिती खालील नंबरवर कळवावी म्हणजे त्याप्रमाणे भोजनाची व्यवस्था करता येईल.
**गुणेश आवटे - व्यवस्थापक : ९४२३९७८९४९**

# सचोटीला पर्याय नाही

**सुधाकर घोडेकर / दिलीप देशपांडे**

तुम्ही केलेला प्रामाणिकपणा आणि सचोटी याची फळं मिळायला थोडा वेळ लागेल; पण ती नक्कीच मिळतात आणि दीर्घ काळ देत राहतात. त्याचप्रमाणे तुम्ही केलेली लबाडी लगेच जरी उघडकीस आली नाही तरी ती काही काळाने का होईना उघडकीस येतेच आणि तुमचं दीर्घकालीन नुकसान करून जाते.

अनेकांना सचोटी आणि प्रामाणिकपणा दाखविणं म्हणजे आपलंच नुकसान करून घेण्यासारखं वाटतं. लबाडीचा क्षणिक आणि थोडा लाभ होतो हे वास्तव आहे; परंतु यातून दीर्घकालीन नुकसान होतं आणि ते मात्र नंतर कधीच भरून न येण्याजोगं असतं हेही तितकंच वास्तव आहे. माझ्या माहितीचे एक व्यापारी आहेत. ते बोलताना नेहमीच म्हणतात, 'धंदा म्हटलं की लबाडी आलीच.' त्यांच्या मते, लबाडी केली तरच व्यवसाय होईल आणि दोन पैसे अधिक मिळतील. सुरुवातीला त्यांनी चांगले पैसे कमावले; पण नंतर त्यांच्या व्यवसायाची वाढ खुंटली आणि सध्या तर ते जेमतेम तग धरून आहेत. त्यांच्या व्यवसायाची ही अवस्था होण्यासाठी त्यांची लबाडी करण्याची प्रवृत्तीच कारणीभूत ठरली आहे. तुम्ही केलेला प्रामाणिकपणा आणि सचोटी याची फळं मिळायला थोडा वेळ लागेल; पण ती नक्कीच मिळतात आणि दीर्घ काळ देत राहतात. त्याचप्रमाणे तुम्ही केलेली लबाडी लगेच जरी उघडकीस आली नाही, तरी ती काही काळाने का होईना उघडकीस येतेच आणि तुमचं दीर्घकालीन नुकसान करून जाते.

## झटपट श्रीमंतीमागे असतो एखादा तरी गुन्हा :

एका इंग्रजी कादंबरीच्या पहिल्याच पृष्ठावर लिहिलं आहे, 'बिहाइंड एव्हरी ग्रेट फॉरच्युन देअर इज अ क्राईम.' म्हणजे प्रत्येक मोठ्या नशीबवानामागे कोणता तरी गुन्हा किंवा लबाडी असते. हे वाक्य बहुतेक सगळ्यांना लगेच पटावे असे आहे; कारण आपण अचानक मोठे झालेले उद्योगपती, श्रीमंत आणि राजकारणी पाहतो. अनेक राजकारणी व्यक्तींनी निवडणुकीच्या वेळी जाहीर केलेले उत्पन्न काही कोटीत असते. वास्तवात ते कोणताच व्यवसाय करत नाहीत. मग हे पैसे आले कुठून, हा प्रश्न सर्वसामान्यांना पडतच असतो. आयकर विभागाला असा प्रश्न का पडत नाही, हे सर्वसामान्यांच्या दृष्टीने एक कोडेच असते. अनेक उद्योजक वीस-पंचवीस वर्षे उद्योग करूनही फार मोठे झालेले दिसत नाहीत; पण त्याउलट काही उद्योजक किंवा व्यक्ती एखाद्या वर्षात कोट्यधीश झालेल्या दिसतात. सामान्य माणूस विचार करतो की, मी इमानदारीत दिवसाचे बारा तास कष्ट करतो, तरीही मला एकरकमी रोख पैसे टाकून कार घेता येत नाही, काहींना मोटारसायकलही घेता येत नाही. यातून एक ठोक असा निष्कर्ष काढला जातो की, आर्थिकदृष्ट्या मोठं व्हायचं असेल, तर काहीतरी गफला, भानगड, करचुकवेगिरी, चोरी, लबाडी हे असं काहीतरी करावंच लागतं. इमानदारीत काम करणं म्हणजे तुटपुंजे उत्पन्न असं वाटायला लागतं. अनेक मोठी झालेली माणसं ही असली कृत्यं करतात हे वास्तव आहे. म्हणून सगळीच मोठी झालेली माणसं या अशा कृत्यातूनच मोठी झाली आहेत असं मात्र नाही. अशा वेळी नको ती माणसे डोळ्यांसमोर येतात आणि त्यांच्या भानगडीही समजतात. त्यामुळे सगळेच मोठे तसे आहेत असा समज होण्याची शक्यता असते आणि तसंच घडतं. वास्तवात अशा भानगडी करून किंवा अनैतिक मार्ग वापरून मोठे झालेल्यांची संख्या त्यामानाने खूप छोटी आहे. यातल्या अनेकांनी सरकारी यंत्रणा आपल्या सोयीने वाकवलेली असते, अनेक संधी निर्माण केलेल्या असतात. एका अर्थाने ह्या भानगडीच आहेत; परंतु त्यांनी व्यवसाय करताना सर्वसामान्यांबाबत फार क्वचित दगाबाजी केलेली असते. असे उद्योजकही आहेतच, पण त्यांची संख्या तर आणखीनच छोटी आहे. वास्तव असं आहे की, तुम्ही अतिशय पारदर्शी राहून, सचोटीने व्यवसाय केला तरीही तरच खऱ्या अर्थाने मोठे होता. असं मोठं होणं नेहमीच प्रतिष्ठेचं असतं, समाधान देणारं असतं. आपलाच आपल्याला अभिमान वाटावा असं असतं.

## लबाडी फार काळ लपून राहत नाही :

एका मोठ्या वर्तमानपत्राच्या कार्यालयातील घटना आहे. वर्तमानपत्र छापताना शेवटी त्या रोलला काही कागद शिल्लक असतो. सगळेच रोल एकाच वेळी बदलायचे असल्याने प्रत्येक रोलला असा कागद शिल्लक असतो. एक व्यावसायिक असे शिल्लक राहिलेले रोल वजनावर विकत घेत असे. त्याने तिथला एक माणूस हाताशी धरून वजनात गडबड सुरू केली. त्या माणसामागे आणखीही दोन व्यक्ती संबंधित होत्या. त्यांच्या हातावर काही रक्कम ठेवायची आणि वजनातली गडबड करत भरपूर नफा कमवायचा, अस सुरू झालं. या व्यावसायिकाने चार वर्षातच एक दुकान विकत घेतलं, फ्लॅट घेतला. त्याने हीच पद्धत आणखी दोन चार वर्तमानपत्रांतून खरेदी करत असलेल्या कागदाबाबत ठेवली होती. एक दिवस मात्र ही चोरी पकडली गेली. व्यवस्थापनाने त्या संबंधित कामगारांवर ठपका ठेवून त्यांना कामावरून काढून टाकलं आणि या व्यावसायिकाला दार बंद केलं. एका वर्तमानपत्रातली ही गडबड इतर वृत्तपत्राच्या व्यवस्थापनाला समजली आणि त्यांनीही याला दारात उभं करायचं नाही असं ठरवलं. त्याचा व्यवसाय केवळ न्यूज प्रिंटमधीलच असल्याने त्याला इतर काही करणं शक्य नव्हतं. त्याच्याकडे अन्य अनुभव नव्हता. त्याने काही दिवसांत विकत घेतलेले दुकान भाड्याने दिलं आणि व्यवसायापासून वेगळा झाला. आता जे काही भाडं येतं तेवढंच उत्पन्न उरलं. जर त्याने सचोटीने

व्यवसाय केला असता तर त्याला मोठं होण्यासाठी चारच्या ऐवजी आठ वर्षं लागली असती; पण पुढे भविष्यातही तो व्यवसाय करू शकत राहिला असता. लबाडी थोडाफार लाभ थोड्या काळासाठी करून देते; पण कायमस्वरूपी नुकसान करते.

### अधिक नफा मिळवणं म्हणजे लबाडी नाही :

व्यवसायात किती नफा मिळवावा याचं गणित ठरलेलं नसतं. किती नफा मिळवणं नैतिक आहे हेही सांगता येणार नाही. मुळात नैतिकतेची नेमकी व्याख्याही करता येणार नाही. तुम्ही तुमच्या वस्तूची किंमत ठरविताना तुम्ही करत असलेला व्यवसाय, सामाजिक स्थिती, व्यवसायाचा आवाका आणि त्याचं त्या क्षेत्रातलं स्थान, तो विकत असलेल्या उत्पादनाचा ग्राहकवर्ग या सगळ्यांचा विचार करून ठरविलेली असते. एखाद्या लिपस्टिकची किंमत जर पाच हजार रुपये ठेवली, तर त्यात सकृतदर्शनी फार काही चुकत आहे असं नाही. ज्याला लिपस्टिकसाठी पाच हजार खर्च करणं परवडतं, तोच ती घेणार आहे. यात कुणाची अडवणूक होत नाही किंवा गैरफायदाही घेतला जात आहे असं वाटणार नाही. त्या लिपस्टिकचा उत्पादन खर्च जरी केवळ शंभर रुपये असला, तरीही फार काही वाटणार नाही; कारण ज्याला कुणाला प्रेस्टिज विकत घ्यायचं आहे आणि प्रेस्टिजसाठी खरेदी करण्याइतकी समृद्धी आहे आणि शिवाय जर त्याला असं वाटत असेल की, या उत्पादनामुळे प्रतिष्ठा मिळणार आहे, तर त्याने ते खुशाल घ्यावं. मात्र, जर एखाद्या आजारावरील औषध आहे आणि ते निर्माण करणारी कंपनीही एकमेव आहे, तरी त्याची किंमत रिजनेबलच असावी, अशी अपेक्षा असते. लोकांच्या जिवाशी खेळून जर कुणी नफा कमावत असेल, तर ते नैतिक समजलं जाणार नाही. याला लबाडी म्हणता येणार नाही किंवा कायद्याच्या भाषेत तो गुन्हाही ठरणार नाही. अनेक औषध कंपन्या ग्राहकांच्या अगतिकतेचा गैरफायदा घेत असतात. या कंपन्यांच्या प्रतिमेशी ग्राहकांना फारसं देणं घेणं नसतं. डॉक्टरांनी लिहून दिलेलं औषधच योग्य आहे आणि त्याशिवाय इलाज नाही असं समजून ग्राहक ते औषध घेत असतात. त्यामुळे ह्या कंपन्या आपल्या उत्पादनातून अवाच्या सवा नफा मिळवत असतात. डॉक्टर मात्र काही खास समर्थन नसतानाही एखाद्या विशिष्ट कंपनीच्या औषधाचाच आग्रह धरत असेल, तर मात्र ती लबाडीच म्हणावी लागेल.

### सचोटी आणि नैतिकता :

सचोटी आणि नैतिकता या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. ही दोन्ही मूल्ये बहुमोलच आहेत आणि माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचे ते अलंकार आहेत. व्यवसायासंदर्भात या दोन्ही मूल्यांचा विचार वेगळ्याच अंगाने करायला हवा. प्रसंग, काळ, उद्देश अशा अनेक पैलूंचा विचार करून नैतिकता तपासावी लागेल. सचोटी मात्र काही ठोक मापदंडावरून तपासली जाऊ शकते. व्यावसायिक सचोटी म्हणजे आपल्याला हवा असलेला नफा विचारात घेऊन आपल्या उत्पादनाची ठेवलेली किंमत. जी किंमत बाजारातील आपदकालातही तशीच राहील आणि अन्य काळातही तशीच राहील ती सचोटी, जी गुणवत्ता अपेक्षित आहे, ती कायमस्वरूपी सांभाळली जाईल ती सचोटी. जे वजनाचं किंवा मापाचं उत्पादन ग्राहकाला देत आहोत, त्यात लबाडी नसणं म्हणजे सचोटी. जी कार्यक्षमता उत्पादनाकडून मिळेल असे आश्वासन दिलेलं असतं, तशी कार्यक्षमता असणं म्हणजे सचोटी, विक्रीपश्चात दुरुस्तीचं आश्वासन पाळणं म्हणजे सचोटी गॅरंटी / वॉरंटी दिली असेल त्याला बांधील असणं आणि निभावणं म्हणजे सचोटी. अनेक मोठ्या कंपन्या प्रसंगी अनैतिक वाटतील अशा गोष्टी करतही असतील; परंतु त्यांनी सचोटी सांभाळलेली असते. उदाहरणच घ्यायचं तर आंतरराष्ट्रीय औषध कंपन्यांचं घेऊ. या कंपन्या अवाच्या सवा नफा मिळवितात. एखाद्या औषधाचा उत्पादन खर्च जेमतेम पन्नास रुपये असेल, तरीही त्याची किंमत शेकड्यात, प्रसंगी हजारात ठेवली जाते. याचं कारण त्यांनी संशोधनावर केलेला खर्च, त्यांच्याकडे असलेले त्या संशोधनाचे हक्क याचा ते लाभ उठवत असतात; पण औषधात भेसळ करत नाहीत. जी मूलद्रव्ये त्यात आहेत असं सांगितलं जातं ती असतातच आणि जितकं औषध एका पॅकिंगमध्ये आहे असं लिहिलेलं असतं तितकं त्यात असतंच. किमतीबाबत त्यांनी ठेवलेले धोरण किती नैतिक आहे यावर कधीच एकमत होणार नाही. या ठिकाणी एक उदाहरण बोलकं आहे. हेपॅटिटीस या आजाराची लस निघाल्यानंतर त्या लसीच्या एका डोसची किंमत एका परदेशी कंपनीने नऊशे रुपये ठेवली होती. असं ठरावीक अंतराने तीन डोस घेणं आवश्यक असतं. म्हणजे एका व्यक्तीसाठी ही प्रतिबंधक लस सत्तावीसशे रुपयांना होती. भारतातील गरीब आणि मध्यमवर्गीयांना ती परवडणे अशक्यच होतं. कुटुंबातल्या पाच व्यक्तींसाठी या लसीचे प्रत्येकी तीन डोस घ्यायचे, तर एका कुटुंबाला पंधरा रुपये हजार लागणार. ही कंपनी मोनॉपोली असल्याने ग्राहकांच्या अगतिकतेचा लाभ उठवीत होती. कंपनीने असा विचार केला होता की, भारतातल्या ज्या ज्या कुटुंबांना इतका खर्च परवडत आहे, तितकी लस खपली तरीही अब्जावधी रुपये मिळणार आहेत. या लसीला पर्याय मिळाला तो एका भारतीय संशोधकाकडून. 'शांथा बायोटेक' कंपनीने या लसीपेक्षा अधिक परिणामकारक लस निर्माण केली आणि केवळ एका डोसला पन्नास रुपये दराने उपलब्ध करून दिली. म्हणजे परदेशी कंपनी भारतीयांना किती लुटत होती ते जाणवेल. लोकांच्या अगतिकतेचा आणि आपल्या क्षमतेचा गैरफायदा कधीच नैतिक समजला जाणार नाही. कोणत्याही काळात आणि कोणत्याही देशात याला नैतिक समजलं जाणार नाही. अनेक उद्योजक, ज्यांच्याकडे त्या उत्पादनाची मक्तेदारी आहे आणि त्यांचे उत्पादन जीवनावश्यक आहे ते या प्रकारे उद्योग करणं आणि कमीत कमी काळात अधिकाधिक लाभ उठवणं हे धोरण म्हणून व्यवसाय करतात. या उद्योजकांना आपल्या उत्पादनाला स्पर्धक केव्हाही येऊ शकतो किंवा आपल्या उत्पादनाला पर्यायही केव्हाही येऊ शकतो याची भीती असते. त्यामुळे हाती असलेली संधी किती काळ टिकणार आहे याची खात्री नसल्याने असे उद्योजक भरमसाठ लाभ उठविताना कशाचाही विधिनिषेध बाळगत नाहीत. हे असे उद्योजक अधिककरून औषध व्यवसायातले सापडतात. ज्या वेळी मोनापोली असते, त्या वेळी सगळ्याच पातळ्यांवर संस्थात्मक उद्धटपणा (कॉर्पोरेट अॅरोगन्स) आलेला असतो. तो अशी संधी संपल्यावर घात करतो.

*'**मी होणारच परफेक्ट बिझनेसमन!**' या पुस्तकातून साभार...*

A I F M P

# OFFICE BEARERS' 2022-23

**PRESIDENT**
**Mr Raveendra Joshi**
United Multicolour Printers Pvt Ltd
264/4, River View Apartment
Shaniwar Peth
Pune – 411 030
Tel : 020-24453043, 24432280
Mobile: 9822082648
E-mail: raviradha2@yahoo.co.uk



**HON. GENERAL SECRETARY**
**Mr Raghabendra N. Dutta Baruah**
Seven Stars Publications Pvt Ltd
6, College Hostel Road, Panbazar
Guwahati 781 001 (Assam)
Tel: 0361-3568560
Mobile: 9854083338
E-mail: rnduttabaruah@gmail.com



**HON. TREASURER**
**Mr K. Rajendran**
Vignesh Offset
No. 28, Malai Street
Ponmar, Chennai - 600 127 (TN)
Tel: 044-35585197
Mobile: 09884724687
E-mail: vigneshoffset@gmail.com



**VICE-PRESIDENT (NORTH)**
**Mr Nitin Narula**
Colourbar Communications
Upper Ground Floor
44 Commercial Complex
Naraina Indl. Area, Phase-I
New Delhi -110 028
Tel: 42455108 • Mobile: 9811218951
E-mail: colourbarcommunications@gmail.com



**VICE-PRESIDENT (EAST)**
**Mr Bidyut Ranjan Nag**
Nag Offset
Colonel Chowmuhani
Agartala - 799001
Mobile: 9366552043
E-mail: bidyutnaghm@gmail.com



**VICE-PRESIDENT (WEST)**
**Mr Anant Vishwanath Joshi**
Sahitya Mudranalaya
1263, Sadashiv Peth
L.B. Bhopatkar Road, Nr. Nimbalkar Talim
Pune - 411030
Mobile: 9923175580
E-mail: avjoshi1@gmail.com



**VICE-PRESIDENT (SOUTH)**
**Mr K. Kumarasamy**
Kumaraswamy Printing Press,
9, Ghouse sahib street, Khaderpet,
Tirupur - 641601
Tel: 0421-2200888
Mobile: 9894041016
E-mail: kktirupur@gmail.com



**HON. JOINT SECRETARY**
**Mr Rahul Mahajan**
Narendera Publishing House
Plot No. 32, Phase - 111, Industrial Estate
Gangyal, Jammu - J & K - 180 010
Tel: 0191-2483527
Mobile: 9419180999, 9018231000
E-mail: rahulnmahajan@yahoo.com



**IMM. PAST-PRESIDENT**
**Mr P. Chander**
Artisan Company
Regd Office: 14(31) Neelakanta Mehta St.
T Nagar
Chennai 600 017 (Tamilnadu)
Mob: 9841023264
E-mail: pasupathychander@gmail.com






# माणसाने किती पासवर्ड लक्षात ठेवायचे?

**प्रकाश आपटे**
सांगली. मोबाईल : ९४२२६१६१५१

आजच्या कॉम्प्युटर आणि मोबाईलच्या युगात ऑनलाईन क्रांती भरपूर झाली आहे. या ऑनलाईन युगात अख्खे जग आपल्या जवळ आहे आणि सर्व गोष्टी अगदी घरबसल्या होऊ लागल्या आहेत. पण याच वेळी ऑनलाईन हॅकिंगला पण तितकेच पेव फुटले आणि यापासून वाचण्यासाठी जन्माला आले आपले :

OTP - ओटीपी - ONE TIME PASSWORD!!!

CAPCHA CODE - मी रोबोट नाही!!!

PIN तुमचा चार / सहा अंकी पिन टाका!!!

आणि असंख्य पासवर्ड!!!

नक्कीच, हे आपल्याच सुरक्षेसाठी असतात याबाबत वादच नाही पण ते किती आणि कसे लक्षात ठेवायचे हा प्रश्न नक्कीच प्रत्येकाला पडतो. त्यातल्या त्यात ओटीपी, कॅप्चा कोड तरी बरे... ते त्या-त्या वेळेला येतात... आणि काम करून निघून जातात. आमची तर सगळी कामे ऑनलाईन असल्याने आम्ही हा अनुभव रोजच घेत असतो.

बरं... आमची वाटचाल ५ जी च्या दिशेनं असली तरी आमचे ओटीपी... २ जी च्या पावलानेच येतात बऱ्याच वेळा. आणि तो OTP आला आणि एंटर केला की, YOUR OTP EXPIRED.. .. PAGE EXPIRED.. कृपया पुन्हा प्रयत्न करा... झालं... पुन्हा नवीन ओटीपी मागवा!!!

आता आमचे कॅप्चा कोड बघा... हे कोड देणाऱ्याचे बहुतेक डोळ्यांचा दवाखाना किंवा चष्म्याचे दुकान असावे असेच वाटते. आलेला कॅप्चा कोड वाचता कसा येणार नाही किंवा तो बघून आणि शोधून तुमच्या डोळ्यांची वाट कशी लागेल याची पूर्ण तजवीज केलेली असते. हे कोड एका भयंकर अशा चौकोनात असतात लपलेले... म्हणजे तुम्ही रोबोट नाही हे सिद्ध करताना तुमचे डोळे फुटलेले आहेत हेही सिद्ध होते. आता कॅप्चा कोड देताना मुद्दाम काही कन्फ्युजिंग कॅरॅक्टर दिली जातात.

उदाहरणार्थ, आता ओळखा... हे इंग्रजी अक्षर 'ओ' आहे की 'झिरो' (शून्य) आकडा? मुद्दाम असे अल्फाबेट निवडायचे की हे कॅपिटल आहेत की स्मॉल कळलेच नाही पाहिजे.

उदाहरणार्थ, बघा हे कॅप्चा कोड वर खाली आहेत असे समजा आणि तुम्हीच सांगा : w, y, u, l, i, o, s, j, k, z, x, c. कॅपिटल समजायचे की स्मॉल??? म्हणजे तुम्ही हमखास चुकलेच पाहिजे याची पूर्ण तयारी...

आता आला आपला मुख्य विषय पासवर्ड!

बघा आपल्या रोजच्या जीवनात आपण कुठे कुठे पासवर्ड टाकतो :

१. मोबाईल चालू करायला,
२. कॉम्प्युटर चालू करायला,
३. ई-मेल अकाउंट उघडायला,
४. कोणतेही कॉम्प्युटर सॉफ्टवेअर वापरायला,
५. ATM कार्ड वापरायला,
६. डेबिट कार्ड / क्रेडिट कार्ड वापरायला,
७. इंटरनेट बँकिंग वापरायला,
८. कॉम्प्युटरवरील फाईल उघडायला,
९. G-PAY करायला,
१०. बँकेचे लॉकर उघडायला,
११. आणि आमच्यासारखे असाल तर इन्कम टॅक्सचा, जीएसटीचा भरणा करायलासुद्धा...

अशा आणि अनेक गोष्टींसाठी आपल्याला पासवर्ड टाकल्याशिवाय पुढे जाताच येत नाही. बरं पासवर्ड ठेवताना तो १० कॅरेक्टरच हवा त्यात कॅपिटल आणि स्मॉल लेटर हवी त्यात अंक पण हवे त्यात स्पेशल कॅरॅक्टर पण हवे आणि सगळ्यात भारी मागील ५ पासवर्ड रिपीट करायचे नाहीत. आणि पासवर्ड विसरलात तर... बापरे... तो रीसेट करायला ज्या दिव्य गोष्टींतून पार पडावे लागते त्याचे वर्णन न केलेलंच उत्तम... पण यातून सुटण्याचा काही मार्ग नाही. कारण शेवटी हे आपल्याच हितासाठी असते ना.

त्यामुळे मला सुचलेला मार्ग म्हणजे... आपणच एक कॉम्प्युटरवर विविध पासवर्डची यादी बनवावी आणि ही फाईल सेव्ह करून ती फाईल उघडायला पण एक पासवर्ड ठेवावा. आणि तेवढाच लक्षात ठेवावा. असे करणे सोयीस्कर... नाही का?

# आपका साथ, साथ फूलों का...

प्रदीप मुनोत

"नाना क्षेत्रांमध्ये अनेक करामती आणि (चांगल्या अर्थाने) उचापती करणारा आमचा हा कर्तबगार आणि हिकमती ज्येष्ठ मित्र 'विद्यापती' पण आहे. म्हणजे केवळ विद्यावहिनींचा पती म्हणून नव्हे तर अनेक विषयांमध्ये रस घेऊन, दांडगा अभ्यास करून प्रभुत्व मिळवणारा हा खरोखरीचा विद्यापती आहे."

प्रभात प्रिंटिंग वर्क्सच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगी १९९४ सालामध्ये पूना प्रेस ओनर्स असोसिएशनच्या विद्यमाने सभासद आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांच्यासाठी एक कार्यक्रम आयोजित केला होता - Advance Course in Offset Printing. फॅकल्टी (श्री. अभिजित पंडित) ठरवण्यापासून त्या कार्यक्रमाचं सर्व नियोजन श्री. सुजितभाऊ पटवर्धन यांनी केलं होतं. त्या कार्यक्रमात सुजितभाऊंचा सत्कार करतेवेळी मी केलेलं त्यांचं वर्णन वर दिलं आहे.

पटवर्धन घराणं मूळ अहमदनगरचं. माझे वडील कनकमलजी पण नगरचे. त्यामुळे पमासाहेब आणि वरच्या पिढीतले सर्व पटवर्धन बंधू माझ्या वडिलांचे-भाईंचे चांगले मित्र होते. पण माझा काही तेवढासा संबंध आलेला नव्हता. १९८६च्या DRUPA मध्ये सुजितभाऊ आणि मी जवळपास दोन आठवडे सोबत होतो आणि तेथूनच आमच्या मैत्रीची सुरुवात झाली. पुढच्या सर्व DRUPA मध्ये आम्ही एकमेकांचे रूम पार्टनर झालो. आम्ही DRUPA मध्ये खूप धमाल करायचो. आणि पुण्याला परतल्यावर आपापल्या रामरगाड्यात असं जुंपून जायचो की पुन्हा भेटायला पुढची DRUPA च उजाडायची. कधीमधी फोनवर संपर्क होत असे पण प्रत्यक्ष भेट मात्र पुढच्या DRUPA मध्येच. सुजितभाऊच्या मागे व्यवसायाव्यतिरिक्त अनेक व्याप असायचे. आणि कोणतीही गोष्ट वरवरच्या पद्धतीने करणं हा सुजितभाऊचा स्वभावच नव्हता. जे करायचं ते मनाला भावेल, मनाला पटेल असंच व्हायला हवं हा त्याचा पिंड होता.

अतिशय उत्तम सौंदर्यदृष्टी लाभलेला कलासक्त प्राणी होता सुजितभाऊ. चित्रकला, सुलेखन (कॅलिग्राफी), टायपोग्राफी, छायाचित्रण, ग्राफिक डिझाइनिंग यात तो प्रवीण होताच पण इतर अनेक गोष्टींमध्ये त्याला प्रचंड कुतूहल असायचे. पर्यावरण हा त्याचा अति जिव्हाळ्याचा विषय. अत्यंत तळमळीने त्याने परिसर ही संस्था चालवली. DRUPAच्या आमच्या वास्तव्यात दोन-चार संध्याकाळी तरी आग्रहाने उर्दू शायरी ऐकवायची आणि किमामचं पान खिलवण्याची फर्माईश करणारा हा रसिक मित्र होता. हो, आम्ही पानं पण घेऊन जायचो त्या काळी! शायरी आणि पानाच्या सोबतीत त्याला पाईप शिलगवायची हुक्की येई आणि त्या उंची, सुगंधी तंबाखूच्या दरवळाने एक वेगळंच वातावरण, वेगळ्याच दुनियेत आम्ही जात असू.

DRUPAमध्ये आम्ही सर्व मंडळी दुपारी २च्या सुमारास तेथे असलेल्या International Delegates' Lounge मध्ये एकत्र जमायचो आणि कोणी काय नवीन पाहिलं हे एकमेकांशी share करीत असू. सुजितभाऊ मात्र बऱ्याचदा दांडी मारत असे. कारण सुजितभाऊचं अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. त्याला अनेक गोष्टींत मनापासून रस असायचा. मध्येच तो ड्युसेलडॉर्फच्या आर्ट गॅलरीत डोकावायचा तर कधी थिएटर किंवा कॉन्सर्टला जाऊन यायचा. नीलाताई वर्देंनी त्याला दिलेलं "पटवर्धन म्हणजे सटकण्यात अगदी पटाईत आहेत" हे बिरुद त्याने शेवटपर्यंत बरोबर ध्यानात ठेवलं होतं!



सुजितभाऊ स्वभावाने अगदी मोकळा-ढाकळा. स्पष्टवक्ता खरा पण फटकळ नव्हता. समोरच्याला समजून घेणारा दिलदारपणा त्याच्या स्वभावात होता. आम्हां दोघांच्या सवयी, स्वभाव इत्यादींमध्ये खूप अंतर असायचं, पण मनमोकळं हसणं आणि मनापासून दाद देणं या गोष्टी कदाचित आमच्यात समान असाव्यात. सुजितभाऊपेक्षा वयात आणि इतर सर्वच बाबतीत मी खूपच लहान होतो पण त्यामुळेच कदाचित सुजितभाऊला माझं भारीच कौतुक असायचं.

सुजितभाऊ आणि आम्ही दोघेही कॅलेंडर्स छापायचो पण आम्ही कधीच एकमेकांचे स्पर्धक नसायचो, उलट एकमेकांची कामं करायचो. पंचांग बाजारात उपलब्ध व्हायच्या खूप आधी आमच्याकडे पंचांगाची माहिती येत असे. सुजितभाऊ हक्काने दर वर्षी आमच्याकडून पुढील वर्षीच्या सणांच्या तारखा घेत असत. व्यवसायातील अडीअडचणीं-बाबतही आम्ही मोकळेपणाने एकमेकांशी बोलायचो.

सुजितभाऊ तसा चोखंदळ होता. माझं त्याचेशी शेवटचं बोलणे झालं असेल दसऱ्याच्या सुमारास. त्याचा फोन आला होता आणि विचारत होता की पुण्यात 'दालबाटी' कुठे चांगली मिळेल? आवाज क्षीण वाटला म्हणून विचारलं तर म्हणाला की आता मी बरा आहे पण मध्ये तब्येत ठीक नव्हती. बराच वेळ आम्ही गप्पा-गोष्टी केल्या. दोन्ही मुली जवळच आहेत, खूप ध्यान ठेवतात असं अगदी समाधानाने बोलला. मग मी सुचवलं की बाहेर खाण्यापेक्षा सर्वांना घेऊन माझ्याच घरी या, आपण इथेच दालबाटी करुया. पण... पण ते व्हायचं नव्हतं.


*आपका साथ, साथ फूलों का*
*आपकी बात, बात फूलों की*

तुमच्या पाईपच्या सुगंधासारखीच तुमची आठवण दरवळत राहील, सुजितभाऊ!

# सुजित पटवर्धन सरांना भावपूर्ण श्रद्धांजली...

श्री. अमोद भोईटे

आज सुजित सरांना जाऊन दहा दिवस पूर्ण झाले. मागील दहा दिवसांमध्ये फक्त त्यांच्याबरोबर गेली २९ वर्षांपासून कसे कसे व काय काय शिकलो, अनुभवले याचा मनोमन फक्त लेखाजोखा चालले. त्यामध्ये तीर्थराजने, सरांविषयी लेख लिहिशील का विचारले. आणि मला खरोखरच भरून आले. सरांविषयी कसे व काय लिहू कळत नव्हते. सर आपल्या सर्वांना जसे परिचित तसेच ते त्यांच्या सामाजिक व पर्यावरण चळवळीमधील अमूल्य अशा कार्यामुळे पुण्यात व पुण्याबाहेर व जगभरात त्यांची ओळख आहे.



सरांचा जन्म ६ सप्टेंबर १९४५ रोजी झाला. लहानपणापासून घरातील सर्व मोठ्यांचा सहवास लाभलेले. घरात त्यांच्या सर्व भावंडामध्ये मोठे, त्यांचे वडील जनार्दन पटवर्धन प्रशासकीय सेवेत होते. अच्युतराव व रावसाहेब पटवर्धन या दोन्ही काकांचा सरांवर प्रभाव होता. ते कृष्णमूर्तींचा विचारांचा पुरस्कर्ते होते. ऋषी व्हॅली येथून शिक्षण घेऊन ते पुढे लंडन येथून प्रिंटिंग आणि डिझाइन डिप्लोमा पूर्ण करून परत मायदेशी परतून त्यांनी त्यांच्या घरातील व्यवसायात संगम प्रेसमध्ये काम पाहण्यास सुरुवात केली. सात वर्षे संगममध्ये काम केल्यानंतर त्यांनी १९७६ साली 'मुद्रा' या नावाने स्वत:ची प्रेस सुरू केली. अत्यंत खडतर परिस्थितीतून पुढे जात मुद्राने ४४ वर्षे पुण्यामध्ये आपल्या व्यवसायाची उत्तम ओळख व स्थान निर्माण केले.

सुरुवातीच्या काळात Second hand machinery घेऊन सुरुवात करत नंतर १९७८ साली Heidelberg चे KORD Single Colour मशीन घेतले व पुढे १९८३ साली Two Colour GTO घेऊन चार रंगी प्रिंटर म्हणून उत्तमोत्तम कामाची सुरुवात केली.

१९९३ साली मी मुद्रामध्ये सरांबरोबर काम करण्यास सुरुवात केली ते सलग २८ वर्षे त्यांच्याबरोबर काम करण्याचे भाग्य मला मिळाले. सरांचा मुद्रण विषयाचा खूपच दांडगा असा अभ्यास होता. ते उत्तम चित्रकार, छायाचित्रकार, कॅलिग्राफी, उत्तम रेखाटनकार व डिझायनर होते. सरांना सतार वादनाची व शास्त्रीय संगीताची आवड होती व ते आवर्जून याविषयी बोलत असत. सरांच्या कामाच्या पद्धतीमुळे मुद्राचा संबंध अनेक नामांकित संस्था व कंपन्यासोबत होता. त्याचसोबत प्रसिद्ध लेखक, नाटककार, चित्रकार व मोठ्या स्थित अशा लोकांसोबत काम करण्याचे मुद्रामध्ये आम्हा सर्वांना संधी मिळाली.

सरांना वाचनाची आवड खूप होती, त्यामुळे मुद्राची स्वत:चे असे एक ग्रंथालय झाले होते. सर जगभरातील Typography, Design, Logo Designing, Colour Management, Printing Book व Management विषयाला धरून अनेक पुस्तके ते विकत घेत असत. जगभरातील How / V & Lc Print अशा मासिकांचे आम्ही Subscriber होतो. सर उत्तम लिहायचे. त्यांचे मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषांवर प्रभुत्व होते.

Designingची आवड असल्याने त्यांनी अनेक Designs व काही Logo ही Design केली होती. सतत आपण आपले स्थान Market मध्ये कसे टिकवून ठेवता येईल यासाठी त्यांनी १९८०च्या दशकात दहा ते पंधरा वर्षे Midyear Calendars ची निर्मिती केली. यामध्ये त्यांनी प्रख्यात छायाचित्रकार अश्विन मेहता, जयंत जोशी, निर्मला सावदेकर यांचे उत्तम फोटो विकत घेऊन कॅलेंडरसाठी वापर केला. सर्व जण त्या काळात मुद्राला पत्र पाठवून अभिप्राय कळवत, ते पाहून आम्हा सर्वांनाच आनंद व्हायचा. याच्या जोडीला डायरेक्ट मेलची त्यांची संकल्पना बरीच वर्षे आम्ही राबविली. Direct Mail तयार करत असताना सर विशेष करून लक्ष देत असत. ते अगदी आमच्या ग्राहकांच्या Mailing list अद्ययावत ठेवण्यासंदर्भात ते नेहमी सांगत असत व आमचा पाठपुरावा करत असत.

'मुद्रा'चे Unique असे स्वत:चे Wall Calender व Pocket Planner (बारा महिन्याची डायरी) आमच्या ग्राहकांनी व हितचिंतकांनी वर्षानुवर्षे वापरली व आमच्या भिंतीवर मुद्राच्या कॅलेंडरसाठी जागा राखीव आहे असे आवर्जून सांगत. काही जण कॅलेंडर मिळाले नाही पाठवून द्या किंवा येऊन घेऊन जात असत. खूप छान वाटायचे आपल्या उत्पादनाचा दर्जा हा त्याच्या वापरावरून कळत असतो. आजही श्री. सतीश गोखले यांच्यासारखे नामांकित Product Designer सांगतात की माझ्याकडे मागील २५ वर्षांपासूनचे Pocket Planners मी अजूनही जपून ठेवले आहेत. त्यांच्यातील नोंदी, तारीख व वेळेनुसार सापडतात. आज काळाच्या ओघात लोकांना या सर्वांचे महत्त्व कमी वाटत असले तरी त्या काळातील उत्तम निर्मितीचा आम्हाला अभिमान वाटतो.

सुजित सरांनी IDC व पुणे विद्यापीठात परीक्षक म्हणूनही काम पाहिले. मुद्रण व्यवसायासोबत त्यांनी पर्यावरणासाठी काम करत

असताना १९८२ साली 'परिसर' या संस्थेची स्थापना केली व त्याद्वारे हरित चळवळ, झाडे लावा, झाडे जगवा, पब्लिक ट्रान्सपोर्ट, पादचाऱ्यांची सुरक्षितता, टेकड्या वाचवा अशा अनेक विषयांवर त्यांचा सखोल अभ्यास होता व जगभरातील घडामोडींवर ते लक्ष ठेवून असत. त्यांनी अनेक परिषदे आयोजित केल्या होत्या. मुद्रण व्यवसायात आपले स्वत:चे स्थान निर्माण त्यांनी केलेच, परंतु सोबत माझ्याप्रमाणे अनेक जण 'मुद्रा'तून त्यांच्या मार्गावर पुढे जाऊन काम करत आहेत. सरांचा स्वभाव कटाक्षाने सचोटीने व प्रामाणिकपणे काम करण्याचा होता. सदैव आपण आपल्या ग्राहकाला उत्तमोत्तम सेवा देण्याचे त्यांनी पाहिले व आमच्याकडून करून घेतले. आज ते सोबत नाहीत, परंतु त्यांचे विचार व शिकवण आम्हाला सदैव पुढे नेईल व त्यांचा आशीर्वादही आम्हाला राहील ही सरांना आम्हा सर्व 'मुद्रा' परिवारांकडून खरी श्रद्धांजली.

# सुजित पटवर्धन

## समाजाभिमुख असलेला वेगळ्या शैलीतला मुद्रक हरपला



**– सुरेन्द्र सावळे**
पेपर-टेक्नॉलॉजिस्ट, जर्मनी

यंदाच्या दीपावलीपूर्वीच एक दु:खद बातमी अनपेक्षितपणे समजली. आधुनिक मुद्रण-तंत्रातील एक अनुभवी जाणकार आणि त्याबरोबरच सामाजिक उत्तरदायित्वाचे सदैव भान असलेला एक जवळचा सुहृद, सुजित पटवर्धन अनंताच्या प्रवासाकरिता आपल्यातून निघून गेले.

प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचा उच्च अभ्यासक्रम इंग्लंडमध्ये पूर्ण करून भारतात परल्यानंतर त्यांचा मला परिचय झाला. 'मुद्रा' या नावाने, आधुनिक तंत्रज्ञान वापरून मुद्रण व्यवसाय सुरू करण्याचे त्यांचे नियोजन पक्के झाले होते आणि त्यासंदर्भात अधूनमधून भेटत होतो. जागा शोधण्याचा प्रश्नच नव्हता; त्यांच्या काकांनी फार पूर्वी सुरू केलेला मुद्रण व्यवसाय 'संगम-प्रेस' या नावाने नारायण पेठेतील स्वत:च्या प्रशस्त वास्तूमध्ये दिमाखदारपणे सुरू होताच. त्यातील एका भागात सुजित यांनी आधुनिक यंत्रसामग्री बसवण्याचे काम सुरू केले होते. गंमत म्हणून एकदा त्यांना विचारले, की काकांच्या व्यवसायात एक स्पर्धक म्हणून उतरणार काय! त्यावर त्यांच्या नेहमीच्या स्मित-वदनाने नकार देऊन त्यांनी ठामपणे सांगितले होते; एकदम वेगळ्या पद्धतीने आणि फक्त गुणवत्तापूर्ण कामेच स्वीकारणार असल्याने स्पर्धेचा प्रश्नच उद्भवत नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळातील देशकार्यामध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या प्रसिद्ध पटवर्धन कुटुंबाच्या उज्वल वारसा त्यांना लाभला होता. व्यवसायात चांगल्यारीतीने स्थिरावल्यानंतर सुजितचे काका जे. कृष्णमूर्तींच्या सान्निध्यात आले. Krishnamurty Foundation of India (KFI) च्या माध्यमातून स्थापन झालेल्या 'ऋषी व्हॅली' येथील शाळेत काही वर्षे शिकल्यामुळे सुजित यांच्यातील नेतृत्वगुण चांगले जोपासले गेले आणि त्याचा उपयोग त्यांना स्वत:च्या व्यवसायाची बैठक बसवताना निश्चितच झाला. पहिली काही वर्षे, नव्याने सुरू केलेल्या 'मुद्रा' या मुद्रणव्यवसायाच्या कामाची आखणी काटेकोरपणे केल्यानंतर त्यांनी कामाची जबाबदारी व्यवस्थापक व इतर मदतनीसांवर सोपवण्याची (Delegation of Duties) पद्धत त्वरेने आणि यशस्वीपणे राबवली. त्यांनी जणू ठरवूनच ठेवले होते, सकाळच्या पाळीमधील (shift) केवळ इतकेच तास मुद्रणालयात व्यतीत करायचे आणि नंतर दुपारचा बराचसा वेळ ते विशिष्ट सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे आणि आयोजित कार्यपद्धतीच्या अंमलबजावणीसाठी राखून ठेवत असत. त्यामध्ये चुकीची विकासनीति, वाहतूक समस्या, नद्या-टेकड्यांवरील अतिक्रमण इत्यादी अनेक प्रश्नांच्या विरोधात काम करण्यासाठी त्यांनी स्वत:ला झोकून दिले होते. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी त्यांनीच स्थापन केलेल्या 'परिसर' या स्वयंसेवी संस्थेच्या कामगिरीबद्दल येथे नव्याने सांगण्याची गरज नाही. मेधा पाटकर यांच्या 'नर्मदा बचाओ' आंदोलनातही ते हिरिरीने सहभागी झाले होते. वाहतूक समस्येबद्दल त्यांना विशेष आस्था होती. केवळ नवे रस्ते आणि उड्डाणपूल उभारून वाहतुकीची कोंडीची जटिल प्रश्नमाला सुटणार नाही; त्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कार्यक्षम करण्यावर ते विशेष आग्रही होते. लोकानुनयी धोरणे राबवणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या धोरणाला कडाडून विरोध करून शाश्वत विकासाच पाठपुरावा करण्याचे त्यांनी कधीही थांबवले नाही. त्यामागे त्यांचा पूर्ण अभ्यास व दृढनिश्चय असल्याने ते एकारलेले कार्यकर्ते कधीच नव्हते.

थोडक्यात काय, तर कुशल मुद्रणतंत्रज्ञ, छायाचित्रकार, सुलेखनकार, सामाजिक समस्यांचा अभ्यासू जाणकार अन् शिवाय 'जॅझ' संगीताचा चाहता असे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व सुजितमध्ये साकारलेले होते. या विविध क्षेत्रांतील मंडळींबरोबर असलेला त्यांचा विपुल लोकसंग्रह म्हणजे त्यांच्या सुजाण व अभ्यासू व्यासंगांचा बहुपेडी आरसाच होता. एक कर्मयोगीच जणू. अज्ञात अशा अनंताच्या प्रवासातच त्यांना मोक्षप्राप्ती होवो ही सदिच्छा!




**Labelexpo India returns 10-13th November 2022 at India Expo Center & Mart - Greater Noida (Delhi NCR), bringing the industry together for four days of live demonstrations.**

Discover state-of-the-art presses, intelligent labels, finishing units, inks, dies and substrates from the leading manufacturers.

With 250 leading suppliers exhibiting this is your opportunity to meet the companies who are driving our industry forward.

View tomorrow's technology today, only at the largest label and package printing event in South Asia.

+ 4 DAYS
+ 4 HALLS
+ 250 EXHIBITORS
+ LIVE DEMONSTRATIONS
+ LEADING SUPPLIERS
+ NEW TECHNOLOGIES
+ LMAI AWARDS

10 – 13 Nov • Greater Noida, Delhi NCR
LABELEXPO
INDIA 2022
www.labelexpo-india.com

**REGISTER TODAY AT:** WWW.LABELEXPO-INDIA.COM


Speedmaster CX 104
TURNING IDEAS INTO PROFIT.
How can you meet the increasing demands of the printing market? The Speedmaster CX 104 has the answer: Easy job changes and a wide range of inline finishing operations paired with an innovative operating concept and intelligent automation. And all that tailored to your business model.
For more technical information and Speedmaster CX 104 pricing details, please contact:
Mr. Viraj Damle, Cluster Sales Head - West
E-mail: viraj.damle@heidelberg.com
Mobile: + 91 98208 61050
See for yourself: heidelberg.com/cx104




## The industry standard for digital label production.

Offer nearly any application imaginable and meet the needs of the world's most creative brands. Add high-value capabilities, from brand protection to embellishments[2], with greater production efficiencies, and grow your business with a field-proven solution.[1]

This narrow-web digital label workhorse enables the widest media versatility and range of applications.[1] You can now deliver even more jobs per day with higher quality.[1]

(1) Based on third-party published market report, 2019. Market-proven solution based the HP Indigo 6000 Digital Press, with over 2000 installations worldwide as of November, 2019.
(2) Requires purchase of the KURZ DM-Jetliner® solution.

For more information, please connect :

**TechNovaCare**
Toll-free (India) : 1 800 267 7474
Phone : +91 22 2741 5474
eMail : help@technovaworld.com
Web : www.technovaworld.com

Scan QR Code for more information

TechNova

© November 2022. TechNova Imaging Systems (P) Limited. The information contained herein is subject to change without notice.